# MT 154

2017 .... .... 1100 Seat No. | | | | | | | |

**–MT 154 –SOCIAL SCIENCE (73) GEOGRAPHY & ECONOMICS (M) – SEMI PRELIM I– PAPER - A**

**Time : 2 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 40**

| | | |
|---|---|---|
| उ.१. | **(अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| (१) | पश्चिम घाटाच्या दक्षिण भागाला **अन्नामलाई** म्हणतात. | 1 |
| (२) | महाराष्ट्राच्या दखखन लाव्हा प्रदेशात **काळी** मृदा विकसित झाली आहे. | 1 |
| (३) | बेसॉल्ट खडकांपासून बनलेली **काळी** मृदा मध्यप्रदेशात आढळते. | 1 |
| उ.१. | **(ब) 'अ' स्तंभ व 'ब' स्तंभ यांच्या योग्य जोड्या लावा.** | |
| (१) | गुरूशिखर - अरवली पर्वतातील उंच शिखर | 1 |
| (२) | सापुतारा - थंड हवेचे ठिकाण | 1 |
| (३) | चंद्रपूर - बिटुमिनस प्रकारचा कोळसा | 1 |
| उ.२. | **(अ) खालील विधानांची भौगोलिक कारणे लिहा. (कोणतीही दोन)** | |
| (१) | १) दखखन पठारी प्रदेशाचा चांगला औद्योगिक विकास झाला आहे.<br>२) महाराष्ट्र हे देशातील एक अग्रेसर औद्योगिकीकरण झालेले राज्य आहे.<br>३) कापड गिरण्या उद्योग हा राज्यातील सर्वात मोठा आणि जुना उद्योग आहे.<br>४) तसेच इतर उद्योगांचा विकास झालेला आहे. उदा. साखर उद्योग, वाहन उद्योग, इलेक्ट्रॉनिक्स उद्योग आणि अन्नप्रक्रिया उद्योग इत्यादी. | 2 |
| (२) | १) पूर्व किनारपट्टीच्या प्रमुख शहरांतून महत्त्वाचे उद्योग विकसित झाले आहेत. उदा. अभियांत्रिकी उद्योग, मोटार उद्योग, टायर उद्योग इ.<br>२) चेन्नई आणि विशाखापट्टणम शहरांमध्ये, जहाजबांधणी, माहिती आणि तंत्रज्ञान निर्मिती, रासायनिक आणि स्वयंचलित वाहने इत्यादी उद्योग येथे विकसित झाले आहेत.<br>३) अशाप्रकारे, पूर्वेकडील किनारपट्टी औद्योगिकदृष्ट्या विकसित आहे. | 2 |
| (३) | १) मध्यवर्तीय उच्चभूमी प्रदेशातील मुख्य पर्यावरणीय समस्या ह्या वृक्षतोड, खाणकाम, औद्योगिकीकरण, वीजनिर्मिती, शहरीकरण, वाहनांची वर्दळ आणि विकास प्रकल्प या बाबींशी संबंधित आहेत.<br>२) या प्रदेशातील वनांची संख्या बेसुमार वृक्षतोडीमुळे घटत आहे. विकास प्रकल्प, खाणकाम आणि वाहतुकीचा विकास यामुळे बहुमूल्य हजारो हेक्टर वनांचा बळी गेला आहे.<br>३) काही मौल्यवान वने शेतीच्या विस्तारामुळे नष्ट झाली आहेत.<br>४) द्विपकल्पीय उच्चभूमी हे भारताच्या खनिजसंपत्तीचे आणि इंधनस्त्रोतांची भांडारे असून सुद्धा सुस्पष्ट खाणकाम धोरण नसल्याने खाणमालक पर्यावरणाचा ऱ्हास करीत आहेत. | 2 |

५) खाण बंद करण्यापूर्वी किंवा दुसरीकडे जाण्यापूर्वी जमीन पुन्हा पूर्वीसारखी सपाट करण्याला किंवा नवीन वृक्षांची लागवड करण्याला ते बांधील नाहीत.

६) खाणींच्या जवळ राहणाऱ्या लोकांच्या आरोग्यावर खनिजांचे कण, धूळ, स्फोट, खाणीतील आगी इ. चे दुष्परिणाम होतात.

७) या प्रदेशात अनेक औष्णिक प्रकल्प आणि कोळसा प्रकल्प आहेत. विद्युत प्रकल्पातून निघालेले टाकाऊ पदार्थ, आजुबाजूचे जलस्त्रोत आणि जलसाठे प्रदूषित करतात.

८) म्हणून मध्यवर्तीय उच्चभूमी प्रदेशात अनेक पर्यावरणीय समस्या आहेत.

उ. २. **(ब) थोडक्यात टीपा लिहा. (कोणत्याही दोन)**

(१) १) कन्नड भाषेत केरे म्हणून ओळखले जाणारे तलाव हे मध्य कर्नाटक पठारावरील सिंचनाची पारंपरिक पद्धत आहे. **2**

२) एकावर एक बांध घालून पाण्याचा साठा केलेल्या धरणांमधून निघालेल्या कालव्यांद्वारे पाणीपुरवठा होत असतो किंवा दऱ्यांमधून वाहणाऱ्या प्रवाहावर बांध घालून तलावाची एक साखळी निर्माण केली जाते.

३) एका तलावातून बाहेर पडलेले पाणी दुसऱ्या तलावात येऊन साचत असते आणि असा संपूर्ण प्रवाह सतत चालू राहतो.

४) सामान्यपणे हे तलाव काही किलोमीटर अंतरावर बांधलेले असतात. यामुळे पुढील दोन गोष्टी निश्चितपणे होत असतात. अ) पाणी वाहून वाया जात नाही आणि ब) ओळीने वर असलेल्या तलावातील झिरपणारे पाणी खालच्या तलावात गोळा होत असते.

(२) १) मध्यवर्तीय पठाराचा नैऋत्य भाग माळवा पठाराने व्यापला आहे. **2**

२) या पठाराची सरासरी उंची ५०० मी. आहे.

३) कमी उठाव आणि सलग भूप्रदेश ही याची वैशिष्ट्ये आहेत.

४) माळव्याच्या सपाट भूप्रदेशावर काही ठिकाणी कमी उंचीच्या टेकड्या आहेत, त्या पठारी पृष्ठभागाच्या वर दिसून येतात.

५) माळव्याच्या पठाराचा बहुतांश भाग हा मध्यप्रदेश राज्यात येतो.

६) हे पठार पश्चिमेला अरवली रांग आणि दक्षिणेला विंध्य रांग यांच्यामध्ये येते.

७) या प्रदेशातून मही नदी उगम पावते, ती पुढे गुजरात प्रदेशात जाते.

८) तसेच चंबळ व बेटवा या नद्याही उगम पावतात आणि त्या उत्तरेकडे वाहतात.

(३) १) पूर्व घाट पश्चिम घाटापेक्षा जैविक अभयारण्ये तसेच जैवविविधतेत पूर्णपणे वेगळा आहे. **2**

२) या घाटात मध्यम स्वरुपाचा पाऊस होतो आणि त्यामुळे या प्रदेशातील बहुतांश वने ही उष्णकटिबंधीय आर्द्र पानझडी किंवा उष्णकटिबंधीय कोरडी पानझडी प्रकारची असतात.

३) पारिस्थितिकीय आणि पर्यावरणीय परिस्थितीत विविधता असल्याने पूर्व घाटात समृद्ध प्राणीजीवन आढळते.

४) आशियाई हत्तींचे ते जगातील सर्वात मोठे वसतीस्थान आहे.

५) मोठ्या प्राण्यांमध्ये बिबटे, सांबर आणि वाघ आढळतात. याशिवाय हा घाट विविध पक्ष्यांच्या जातींसाठी प्रसिद्ध आहे.

उ. ३. (अ) **खालील सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा रेषालेख तयार करा.** 2




उ. ३. **(ब) खालील नकाशाचे वाचन करुन त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)**

(१) वरील नकाशात माळवा पठार व छोटा नागपूर पठार हे प्रमुख पठार दिसत आहेत. 1

(२) मध्यवर्ती उच्चभूमीच्या पश्चिमेस अरवली पर्वत आहे. 1

(३) दामोदर नदी व सुवर्णरेखा नदी या पूर्वेकडे वाहणाऱ्या नद्या आहेत. 1

(४) चंबळ, बेटवा, केन, सोन या उत्तरेकडे वाहणाऱ्या नद्या आहेत. 1

| | | |
|---|---|---|
| उ. ३. | (क) तुम्हांस पुरविलेल्या भारताच्या आराखड्यात पुढील घटक दाखवा, तसेच त्यांची नावे द्या व चिन्हांची सूची द्या. (कोणतेही दोन) | |
| |  | 2 |
| उ. ४. | **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** | |
| (१) | दखखनच्या पठाराचे पुढीलप्रमाणे उपविभाग पडतात -<br>अ) सातपुडा - महादेव मैकल रांग<br>ब) महाराष्ट्र पठार<br>क) कर्नाटक - तेलंगणा पठार<br>ड) पूर्वेचे पठार :- महानदीचे खोरे, दंडकारण्य आणि गहर्जातचे पठार | 4 |

**अ) सातपुडा - महादेव मैकल रांग :**

१) हा डोंगररांगांचा एक समूह असून तो पूर्व-पश्चिम पसरला आहे. आणि दखखनच्या पठाराची उत्तर सीमा आहे. या समूहातील सर्वात पश्चिमेकडील रांग म्हणजे सातपुडा पर्वतरांग होय, तिने नर्मदा व तापी नद्यांच्या दरम्यांचे क्षेत्र व्यापले आहे. सातपुडा रांग पूर्व गुजरातपासून सुरू होते आणि पूर्वेकडे ती सुमारे ८०० किमी. पर्यंत पसरली आहे. या रांगेचे उंचीचे सातत्य मध्यभागी कमी झाले आहे. ती बऱ्हाणपूर खिंड म्हणून ओळखली जाते आणि यातून उत्तर भारताकडे अनेक मार्ग जातात. डोंगरांचा माथा म्हणजे एक प्रकारे पठारच असून त्यांची उंची सुमारे ७०० मी. आहे, तर काही डोंगर ९०० मी. पेक्षा जास्त उंचीचे आहेत.

२) सातपुडा पर्वताचा पूर्वेकडील विस्तार महादेव आणि मैकल रांगांच्या रुपाने दिसून येतो. या रांगा अनुक्रमे मध्य प्रदेश आणि छत्तीसगढ राज्यांमध्ये आहेत. मैकल रांग साधारपणे उत्तर-दक्षिण पसरली आहे आणि नर्मदा व महानदीचे खोरे यामधील दुभाजक म्हणून ती काम करते. हे डोंगर समूह नर्मदा, महानदी आणि वैनगंगा या तीन नदी प्रणालींची पाणलोट-क्षेत्रे आहेत.

**ब) महाराष्ट्र पठार :**

१) 'डेक्कन ट्रॅप' संरचनेतील बेसॉल्ट खडकांनी दखखनच्या पठाराचा वायव्य भाग व्यापलेला आहे. तो भाग महाराष्ट्र पठार म्हणून ओळखला जातो. या पठाराच्या पश्चिम सीमेलगत पश्चिम घाट आहे.

२) लाव्हारस पसरल्यामुळे या क्षेत्रातील बेसॉल्ट खडक तयार झाला आहे. या काळ्या खडकांच्या थराची सर्वात जास्त जाडी महाराष्ट्र पठाराच्या पश्चिम सीमेजवळ सुमारे २ कि.मी. आहे. बेसॉल्ट खडकांच्या क्षितिज समांतर रचनेमुळे त्या प्रदेशाला भिन्न उंचीवर असलेल्या सपाट भूभागांच्या मालिकेचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

३) महाराष्ट्र पठारावरील डोंगरमाथे सामान्यतः सपाट आहेत. पठाराची उंची सुमारे ५०० मी. ते ६०० मी. आहे. या पठाराचा उत्तर भाग तापी नदीच्या खोऱ्याने व्यापला आहे. त्याचा उतार पश्चिमेकडे आहे. तापीच्या दक्षिणेकडील पठाराचा उर्वरीत भागाचा सौम्य उतार पूर्व दिशेला आहे आणि त्याने गोदावरी व कृष्णा खोऱ्यांचा वरचा भाग व्यापला आहे.

४) पश्चिम घाटाच्या अनेक उपशाखा पश्चिम ते पूर्व दिशेकडे जातात आणि विविध नद्यांच्या खोऱ्यांचे दुभाजक बनतात. महाराष्ट्र पठाराचा पूर्व भाग वर्धा-वनगंगा खोऱ्याने व्यापला असून या नद्या साधारणतः उत्तर-दक्षिण दिशेला वाहतात.

**क) कर्नाटक - तेलंगणा पठार :**

१) कर्नाटक तेलंगणा पठार हे दखखन पठाराचा सर्वात दक्षिणेकडील भाग होय. दखखनच्या पठाराचा सर्वात मोठा भाग या पठाराने व्यापला आहे. हा स्फटिकमय खडकांचा प्रदेश असून मुख्यतः कणाश्म व पट्टिताश्म शिवाय काही रुपांतरित खडकही तेथे आढळतात.

२) या प्रदेशात उत्तरेला गोदावरी व कृष्णा नद्यांच्या खोऱ्यांचा काही भाग असून दक्षिणेला कावेरी नदीचे खोरे आहे. ही दोन विस्तारित क्षेत्रे म्हणजे दोन स्वतंत्र पठारे आहेत. संपूर्ण पठारावर अनेक कमी उंचीच्या आणि गोलाकार कणाश्म खडकांनी बनलेल्या टेकड्या आहेत.

३) कर्नाटकमध्ये पठारी प्रदेशाला 'मैदान' म्हणतात. मैदानाची सरासरी उंची ४०० मी. आहे. या पठाराचे वैशिष्ट्य म्हणजे अनेक कमी उंचीच्या टेकड्या आहेत. ज्या विविध नद्यांच्या खोऱ्यांचे विभाजन करतात. या पठाराचा सर्वसाधारण उतार पश्चिमेकडून पूर्वेकडे आहे.

| | | |
|---|---|---|
| | ४) तेलंगणाचे पठार हे कर्नाटक पठाराच्या पूर्व आणि ईशान्य दिशेला आहे. या प्रदेशाची पूर्व सीमा ही पूर्व घाट आहे. हा प्रदेश सपाट असून त्यावर काही मोजक्या ठिकाणी घुमटाकार टेकड्या आढळतात. या प्रदेशातील सरासरी उंची ३०० ते ६०० मी. आहे.<br>ड) **पूर्वेचे पठार :**<br>◆ **महानदीचे खोरे -**<br>१) छोटा नागपूरच्या पठाराच्या दक्षिणेच्या तुलनेने कमी उंचीचा प्रदेश आहे आणि तो जवळजवळ सर्व बाजूंनी डोंगर रांगांनी आणि पठारांनी वेढलेला आहे.<br>२) छत्तीसगढ राज्याचा मध्यभाग आणि ओडिशा राज्याचा पश्चिम भाग या खोऱ्याने व्यापला आहे. त्याच्या पश्चिम सीमेवर मैकल रांगा आणि पूर्व सीमेवर पूर्व घाटाचे डोंगर आहेत.<br>३) खोऱ्याच्या दक्षिणेला दंडकारण्य पठार आहे. त्याच्या सभोवताली असलेल्या पठारांची किंवा डोंगररांगांची सरासरी उंची ५०० मी. आहे तर बहुतेक ठिकाणी सखल प्रदेशाची उंची सरासरी ३०० मी. आहे. या प्रदेशाचा उतार पूर्वेकडे आहे.<br>◆ **दंडकारण्य -**<br>१) छत्तीसगढ राज्याचा दक्षिण भाग आणि ओडिशा राज्याचा नैऋत्य भाग दंडकारण्य म्हणून ओळखला जातो. दंडकारण्याचा मध्य भाग हे उंचावलेले पठार असून त्याची उंची सुमारे ७०० ते ८०० मी. आहे.<br>२) या पठाराचे इंद्रावती नदीमुळे प्रत्यक्षात दोन भाग झाले आहेत. इंद्रावती पूर्वेकडून पश्चिमेकडे वाहते. दंडकारण्य क्षेत्र लोहखनिजाच्या साठ्यांसाठी प्रसिद्ध आहे.<br>◆ **गहर्जात डोंगर -**<br>१) या डोंगरांनी ओडिशा राज्याचा वायव्य भाग व्यापला आहे. या प्रदेशातून ब्राह्मणी आणि बैतरणी नद्या वाहत आहेत. | |
| (२) | १) जास्त पर्जन्यमान, उष्ण व दमट हवामान त्यामुळे घाट प्रदेशात नैसर्गिक वनस्पतींची भरघोस वाढ झाली आहे.<br>२) दक्षिण सह्याद्रीतील काही प्रदेशाला उष्ण कटिबंधीय वनांचे वरदान लाभले आहे.<br>३) दक्षिणेकडे आपण 'शोला' वने पाहू शकतो, यांमध्ये अनेक जातींचे वृक्ष आढळतात.<br>४) लागवड केलेल्या वनांमध्ये निलगिरी आणि साग हे वृक्ष आढळतात. मध्य घाट प्रदेशाच्या आसपास मर्यादित घनदाट जंगले आढळतात.<br>५) पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात वन्य प्राणीजीवनात वैविध्य आढळते.<br>६) हत्ती, गवे, बिबळे, काळे चित्ते, वाघ, अस्वले विविध प्रकारची माकडे, रानडुकरे इत्यादी प्राणी या भागात आढळतात.<br>७) किनारी प्रदेशात वनांची घनता आणि विविधता एकदम कमी होते.<br>८) वनक्षेत्रात काजू व फणसाच्या झाडांची वनीकरण कार्यक्रमांतर्गत लागवड केली जाते.<br>९) कोकणाच्या उत्तर विभागात, अंजन, कांचन इ. वृक्ष जास्त प्रमाणात आढळतात. | 4 |
| (३) | १) द्वीपकल्पीय पठारावरील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती हा आहे.<br>२) कापूस आणि सोयाबीन ही महत्त्वाची नगदी पिके येथे घेतली जातात. | 4 |

| | | |
|---|---|---|
| | ३) इतर जिल्ह्यांची अर्थव्यवस्था मुख्यत्वे शेतीवर अवलंबून आहे.<br>४) भारताचे द्विपकल्पीय पठारी प्रदेश सिंचनासाठी पावसावर अवलंबून आहे. बुंदेल खंडातील सिंचनाचे मुख्य स्त्रोत हे विहिरी असून विहिरीतील पाणी पावसावर अवलंबून आहे.<br>५) या प्रदेशात घेतली जाणारी इतर पिके म्हणजे गहू, भात, ज्वारी, मका, बाजरी, हरभरा, मूग, उडीद आणि सोयाबीन प्रमुख पिके आहेत.<br>६) परंतु, जमिनीची नापीकता, कमी उत्पादकता, सिंचन सुविधांचा अभाव आणि आधुनिक पद्धतींचा वापर न करणे या बाबींमुळे शेतीचा विकास खुंटला आहे. | |
| | **अर्थशास्त्र** | |
| उ. ५. | **कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.** | |
| (१) | भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचे स्वामित्व, नियंत्रण आणि व्यवस्थापन **खासगी व्यक्तींद्वारे** केले जाते. | 1 |
| (२) | सार्वजनिक वितरण प्रणाली **जीवनावश्यक** वस्तूंच्या किंमतींवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते. | 1 |
| उ. ६. | **खालील प्रश्नांची प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | |
| (१) | निराधार योजने अंतर्गत ज्येष्ठ नागरिकांसाठी प्रत्येक शिधापत्रिकाधारकाला सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे दरमहा १० किलो तांदूळ मोफत दिले जातात. | 2 |
| (२) | उत्पादन कसे करावे? यासाठी श्रमप्रधान तंत्र व भांडवलप्रधान तंत्र या दोन तंत्रांचा वापर केला जातो. | 2 |
| (३) | १) भारतात स्वस्त धान्य दुकानांची संख्या १९६० मध्ये ४७ हजार होती. ती १९९९ मध्ये ४.५८ लाख झाली.<br>२) तसेच ही संख्या २००२ मध्ये ४.७४ लाख तर २०११ मध्ये ४.९९ लाख एवढी वाढली. | 2 |
| (४) | मिश्र अर्थव्यवस्थेत संरक्षण, अणूऊर्जा आणि रेल्वे यांसारख्या महत्वपूर्ण उद्योगांचे स्वामित्व व व्यवस्थापन सार्वजनिक क्षेत्राकडे असतात. | 2 |
| (५) | १९४३ च्या बंगालच्या दुष्काळानंतर लगेचच सार्वजनिक वितरण प्रणाली अस्तित्वात आली. | 2 |
| उ. ७. | **खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर पाच ते सहा ओळींत लिहा.** | |
| (१) | १) या प्रश्नामध्ये साधनसामग्रीचे कार्यक्षम विभाजन व त्यांचा योग्य वापर यांचा समावेश होतो.<br>२) विकासाचा उच्चतम दर गाठण्यासाठी साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर होणे अत्यंत महत्वाचे असते.<br>३) म्हणून, विविध उत्पादक उपक्रमांमध्ये उपलब्ध साधनांचे विभाजन अशा रितीने झाले पाहिजे, जेणे करुन, एकूण उत्पादन सर्वाधिक होईल.<br>४) साधनांचा अपुरा किंवा अयोग्य वापर होऊ शकतो. अशा परिस्थितीत, एकूण उत्पादन पुर्ण क्षमतेपेक्षा कमी होते.<br>५) उपलब्ध साधनसामग्रीचा कार्यक्षम वापर, अर्थव्यवस्थेतील मूलभूत प्रश्न सोडवण्यासाठी उपयुक्त ठरतो. | 4 |

| | | |
|---|---|---|
| (२) | १) **सुरक्षिततेचा अधिकार :**<br>आरोग्याला व जीवनाला अपायकारक वस्तू आणि सेवांपासून ग्राहकांना संरक्षण मिळाले पाहिजे. उदा. दोषयुक्त वाहने, निकृष्ट प्रतीची विजेची उपकरणे, हानीकारक किटकनाशके इत्यादींपासून संरक्षण.<br>२) **माहिती मिळविण्याचा अधिकार :**<br>वस्तू व सेवांची गुणवत्ता, शुद्धता, किंमत, नगसंख्या, प्रमाणीकरण याबाबत अचूक माहिती ग्राहकाला मिळाली पाहिजे.<br>३) **निवड करण्याचा अधिकार :**<br>बाजारात विविध प्रकारच्या वस्तू असतात, त्यातून ग्राहकांना त्यांच्या खरेदीक्षमतेनुसार व पसंतीनुसार वस्तू व सेवांची निवड करण्याचा अधिकार आहे.<br>४) **तक्रार ऐकविण्याचा अधिकार :**<br>उत्पादक आणि वितरकांना उत्पादनाविषयीचे आपले मत ऐकवण्याचा अधिकार ग्राहकाला आहे.<br>५) **तक्रार निवारण्याचा अधिकार :**<br>वस्तू आणि सेवांच्या किंमती व गुणवत्तेसंबंधीच्या तक्रारींचे निवारण करण्याचा अधिकार ग्राहकाला आहे. आवश्यक असल्यास विक्रेत्याने किंवा उत्पादकाने ग्राहकाला वस्तू बदलून किंवा दुरुस्त करुन दिली पाहिजे.<br>ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेमध्ये जिल्हा मंच, राज्य आयोग व राष्ट्रीय आयोग यांचा समावेश होतो.<br>६) **ग्राहक शिक्षणाचा अधिकार :**<br>व्यापारातील गैरप्रकार रोखण्यासाठी संबंधित कायद्यांची माहिती करुन घेण्याचा तसेच तक्रार करण्याच्या प्रक्रियेचा पाठपुरावा करण्याचा अधिकार ग्राहकांना आहे.<br>७) **स्वच्छ पर्यावरणासंबंधी अधिकार :**<br>प्रत्येकाला प्रदूषणमुक्त पर्यावरण उपभोगण्याचा अधिकार आहे. त्यानुसार ग्राहकाच्या वस्तीत कोणी कचरा, हवा, पाणी, ध्वनी इत्यादींमुळे प्रदूषण निर्माण करत असेल तर ग्राहकाला त्याबद्दल तक्रार नोंदवून तिचे निवारण करण्याचा अधिकार आहे.<br><br>❖❖❖❖ | 4 |